16:34:28 **स.क्रि.केस नं. ७९४/२०२४**

हनुमान ग्रामीण बिगर शेती पतसंस्था वि. सुमितकुमार विश्वास डोंगरे

**निशाण नं.१५/क/लगत**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेतर्फे शपथेवर सुरु**

३७. आजरोजी आरोपी सकाळी न्यायालयात हजर होता. आरोपी मला न्यायालयात भेटला होता. माझे त्याच्याशी बोलणे थोडेसे झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला क्रॉस घेतला तरी फायदा होणार नाही असे मी सांगितलेले नाही.

३८. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या व्यक्तीने पैसे काढले किंवा भरले त्याच्या नोंदी या खाते उताऱ्यावर येतात. आम्ही कर्ज कल्याण निधी हा विम्याकरिता जमा करून घेतलेला आहे. कर्ज कल्याण निधी तो विमासाठी घेतला जातो. कर्ज कल्याण निधी विमाकरिता तसा कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केलेला नाही. कर्ज कल्याण निधी आम्ही कट करून घेतो त्याबाबत नियम व पोटनियममध्ये नमूद आहे. आमच्या संस्थेचे सर्व नियम व पोट नियम आहे किंवा कसे याबाबत मला सांगता येणार नाही.

प्रश्न – संस्थेचे नियम व पोट नियम कोणाकडून मंजूर करून घेतले जातात ?
उत्तर – सहकार खात्याकडून घेतले जातात.

३९.कर्ज कल्याण निधी हा मी वर्णन केलेल्या नियम पोट नियमानुसारच घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज कल्याण निधीची पूर्ण रक्कम खात्यावर नोंद केली जाते. कर्ज कल्याण निधीमधील खाते उताऱ्यावरील नोंद दि. ०८.११.२०२३ रोजी ४, ५००/– अशी आहे. सदर खातेउताऱ्यावर कर्ज कल्याण निधी रक्कम रु.५०००/– आहे. हे म्हणणे

खरे आहे की, खातेदाराच्या खात्यावर रक्कम रु. ४५००/– वर्ग झाले व रक्कम रु. ५०००/– घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रक्कम रु. ५०००/– खात्यावर दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जी रक्कम रु. ४,५००/– खाते उताऱ्यामध्ये दिसून येत आहे ती या रक्कम रु. ५००० मधील नाही.

प्रश्न – सदर कर्ज कल्याण निधी ५००० मधील ४५०० आपण खात्यावर ओढले तर उर्वरित ५०० रुपये कुठे गेले ?
उत्तर – आरोपीची कर्जाची रक्कम जशी कमी येते त्यावेळी त्याला ५०० रुपये कमी केलेले आहे.

प्रश्न –कर्जाची रक्कम जस जशी कमी होत जाते तस तसा कल्याण निधी कमी होत जातो त्याबाबतचा कागद तुम्ही संस्थेमध्ये करून ठेवता का ?
उत्तर – तसा कागद ठेवला जातो.

४०.तो कागद आवश्यकता वाटल्यास मी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे. तो कागद पुढल्या तारखेला तो कागद हजर करू शकतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आवश्यकता वाटल्यास मी हजर करू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०९.१०.२०२४ रोजी फिर्याद दाखल करतेवेळी या आरोपीविरुद्ध कोणतीही फिर्याद दाखल करण्याचा ठराव नि. १६ वगळता तुम्हाला संस्थेने दिलेले नाही.

प्रश्न दि. ०९.१०.२०२४ ठराव नसल्यामुळे या आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल करण्याचा तुम्हाला सहकार कायद्याप्रमाणे कोणताही अधिकार नाही?
उत्तर हे म्हणणे चुकीचे आहे.

प्रश्न या आरोपीविरुद्ध तुम्हाला दि. ०९.१०.२०२४ रोजी फिर्याद दाखल करण्याचे कोणतेही अधिकार नसताना या आरोपीविरुद्ध तुम्ही फिर्याद दाखल केली ?
उत्तर – दि. २५.१२.२०२२ रोजीच्या ठरावानुसार मी फिर्याद दाखल केलेली आहे.

(सदर प्रश्नाच्या अनुषंगाने आरोपी तर्फे वकील यांनी अशी हरकत नोंदविली की, यात मी फक्त दि. ०९.१०.२०२४ रोजी अनुषंगाने प्रश्न विचारला होता त्यामुळे साक्षीदारास दि. २५.१२.२०२२ बाबत उत्तर देता येणार नाही. सदर उत्तराच्या अनुषंगाने फिर्यादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद नोंदविला की, सदर साक्षीदाराने ठरावाचे अनुषंगाने उत्तर दिलेले आहे त्यामुळे याबाबत आक्षेत नोंदविता येणार नाही. दोन्ही सन्माननीय विधीज्ञांच्या युक्तीवादाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, सदर कामी उलटतपासात प्रश्न व उत्तर घेण्यात आले आहे त्यामुळे सदरची हरकत ही भारतीय पुरावा कायद्यानुसार ग्राहय धरता येणारी नाही. सबब हरकत फेटाळण्यात येत आहे. )

४१.हे म्हणणे खरे नाही की, एखादा व्यक्ती जर एखादा कागद लिहीत असेल तर तो कागद शेवटपर्यंत ती व्यक्ती तशाच पद्धतीने लिहीत जाते. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या धनादेशामधील तारीख व रक्कम यांचे आकडे वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, धनादेशामधील तारीख इंग्रजी व रक्कम मराठी असे दिसून येत आहे. सदर धनादेशाच्या अनुषंगाने उलटतपासात प्रश्न विचारण्यात आलेला असल्यामुळे त्याला नि. १९ देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला कधीही चेक दिलेला नाही तसेच त्यावर त्याने माझे समक्ष सही केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला सदरचा चेक लिहून आणून दिलेला होता. तो चेक कोणाकडे लिहीला, काय लिहीला याची मला प्रत्यक्ष माहिती आहे. तो चेक कोणाकडे लिहीला, कसा लिहीला व काय लिहीला याची मला प्रत्यक्ष माहिती आहे. सदरचा चेक हा आरोपीने स्वतः घरातून लिहून आणला व

माझे समक्ष सही केली. सदरचा चेक त्याने पेनाने लिहीला होता. त्याने सदरच्या धनादेशामध्ये संस्थेचे नाव लिहीले होते. कर्जदार एखादी रक्कम देणे लागत असेल तर जी नोटीस पाठविण्यात येते त्यामध्ये येणे बाकी रक्कम ही लिहावी लागते.

प्रश्न – तुम्ही या प्रकरणात दाखल केलेले संस्थेचा ठरावासह अन्य कर्ज प्रकरण संबंधी कागदपत्रे खाते उतारा वगळता संस्थेतील मूळ कागद हजर करण्यास तयार आहात का ?
उत्तर – नाही.

प्रश्न – ते कागदपत्र हजर करण्यास तुम्हाला अडचण काय आहे ?
उत्तर – मला तशी अडचण सांगता येणार नाही.

४२. मी हजर केलेला संगणकीकृत खाते उतारा हा एच पी कंपनीचा आहे. त्याचा प्रोसेसर मला सांगता येणार नाही. त्या संगणकामध्ये डे बाय डे नोंदी करतो. संगणकामध्ये आम्ही ज्या नोंदी करतो  त्या खाते उताऱ्याचे मॅन्युअली नोंदी ठेवतो. आमच्या संस्थेमध्ये जे संगणक आहे त्याला जियो सर्वरद्वारे अॅक्सेस मिळतो. आम्ही ज्या नोंदी संगणकामध्ये ठेवतो तो सॉफटवेअर ज्या कंपनीने दिला त्याचे नाव मी सांगू शकतो. त्याचे नाव के ३ वन पी ओ सीट असे आहे. माझ्या माहितीनुसार सदरची कंपनी बँगलोर मधील आहे. आम्ही संगणक जेथे ठेवलेले आहे तेथे निर्जंतुकीकरण करतो. आम्ही आमच्या संगणकामध्ये Antivirus वापरतो. सदरचा Antivirus आम्ही एक ते दोन वर्षाकरिता असलेला वापरतो. एखादी कंपनी Antivirus ही अंदाजे १२ महिन्यांकरिता देते. दोन वर्षांपर्यंत देणारे Antivirus चे मला नाव सांगता येणार नाही. Antivirus एक ते दोन वर्षांकरिता कोणत्या कंपनीचा वापरतो ते मला आठवत नाही. आम्ही कोणत्या कंपनीचा Antivirus वापरतो तो मला सांगता येणार नाही. आम्ही वापरत असलेला संगणक हा कोणत्या मॉडेलचा व

कोणत्या जनरेशनचा आहे ते मला सांगता येणार नाही. आमच्या संगणकामधील संस्थेच्या ज्या नोंदी होतात त्या नोंदी या क्लार्क लोक ठेवतात. जो व्यक्ती नोंद ठेवतो तो संगणक प्रशिक्षण झालेला व्यक्ती आहे. ज्या व्यक्तीचे संगणक प्रशिक्षण झालेले आहे त्या व्यक्तीचे प्रमाणपत्र संस्थेमध्ये आहे. माझ्या माहितीनुसार त्याचे प्रमाणपत्र शासनमान्य आहे. त्या व्यक्तीचे MSCIT झालेले आहे अन्यप्रशिक्षणबाबत काही मला सांगता येणार नाही. मी आमच्या संगणकाबाबतचे प्रमाणपत्र मी या कामी हजर केलेले नाही. ते प्रमाणपत्र मी आवश्यकता वाटली नसल्यामुळे हजर केलेले नाही. मला इंग्रजी बऱ्यापैकी समजते. (साक्षीदारास प्रमाणपत्रातील मजकूर वाचून दाखविणयत आला.)

४३.हे म्हणणे खरे आहे की, आता मला वाचून दाखविण्यात आलेले प्रमाणपत्र हे आमच्या संगणकामधून मी जनरेट केलेले आहे. सदर प्रमाणपत्राच्या अनुषंगाने उलटतपासात प्रश्न विचारण्यात आल्यामुळे त्यास नि. २० देण्यात येत आहे. मी वर संगणबाबत जी माहिती सांगितली त्याचे वर्णन या प्रमाणपत्रात करायची मला आवश्यकता वाटली नाही. सहकार कायदा मला थोडा थोडा माहिती आहे. सहकार कायदा कलम ४० read with Rule ३४ याची माहिती मला माझ्या वकिलांनी सांगितली होती. सदरचा कलम ४० read with Rule ३४ कशा संदर्भातील आहे याची मला माहिती आहे. मला आमच्या वकिलांनी सहकार कायदा कलम ४० read with Rule ३४ नुसार खातेउताऱ्याच्या नोंदी या मॅन्युअली ठेवाव्या लागतात याची माहिती सांगितलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जे प्रमाणपत्र हजर केले आहे त्यासोबत आरोपीच्या खात्याचा मॅन्युअली खाते उतारा मी या कामात हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हजर केलेले नि. २० वरील प्रमाणपत्र प्रस्तुत खाते उताऱ्यास लागू होत नाही. सदर धनादेश मी बँकेत भरणा केला होता. सदर धनादेश हा बँक ऑफ इंडिया शाखा. कोतोली येथे भरला होता.

प्रश्न – सदरचा धनादेश हा आरोपीने बांबवडे शाखेकरिता दिला किंवा कोतोली शाखेकरिता दिला ?

उत्तर – बांबवडे शाखेकरिता दिला.

४४.एखाद्या आरोपीने धनादेश दिला तर ज्या शाखेचे कर्ज आहे त्या संस्थेच्या शाखेला धनादेश वटविण्याकरिता दिला जातो. सदर आरोपीने बांबवडे शाखेला कर्जासंबंधी धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, बांबवडे शाखेचे सर्व दैनंदिन व्यवहार हे नियमित वेगळे ठेवले जातात.

प्रश्न – या आरोपीने जो धनादेश दिलेला आहे तो धनादेश बांबवडे कर्ज शाखेकरिता दिलेला नाही ?

उत्तर – हे म्हणणे चुकीचे आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आरोपीच्या धनादेशावर शाखा. बांबवडे असे लिहायचे राहून गेलेले असेल.

४५. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील धनादेश हा आरोपी याने बांबवडे शाखेकरिता दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा धनादेश हा कोतोली संस्थेच्या कोणत्याही नावाने दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, हा आरोपी कधीही कोतोली शाखेला कधीही गेलेला नाही व माझ्या समक्ष कोणत्याही धनादेशावर सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीने आमच्या संस्थेकडून कधीही कर्ज काढले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने कोणतेही कर्ज काढले नसताना केवळ नाहक त्रास देण्याच्या हेतूने मी आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. सेंव्हीग खाते व कर्ज खाते यातील फरक मला माहीत आहे. सेंव्हीग खातेमधून बचत ठेवली जाते व कर्ज खात्यामधून कर्ज दिले जाते. सेंव्हीग खात्यामध्ये बचत रक्कम ही त्याच्या स्वतःच्या ठेवीमधून व रक्कमेमधून ठेवली

जाते. खाते उतान्यामध्ये वकील फी, कोर्ट स्टॅम्प फी, वकील नोटीस फी याबाबत पोट नियमामध्ये तरतूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीचा कोणताही खाते उतारा नसताना सदर आरोपीचा बोगस खाते उतारा मी या कामी हजर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी या आरोपी विरुद्ध खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

18:00:25

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २६.०२.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा